नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/03/2024 (गुरूवार) दुपार

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कार्यवाही

दिनांक ०७/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन काटोल उपविभागात पो.स्टे. जलालखेडा हद्दीत पेट्रोलीग करीत असतांना गोपनीय माहीती मिळाली की, थडीपवणी ते अंबाडा रोडनी एक ट्रॅक्टर संलग्न ट्राली मध्ये अवैद्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशी माहिती मुखबीरद्वारे मिळाल्याने नमुद घटनास्थळावर नाकाबंदी केली असता महिंद्रा अर्जुन ट्रॅक्टर विना नंबरचां ट्रॉली सह येतांनी दिसले. ट्रॅक्टरच्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक **आरोपी नामे— महेश रामहरी मोगरे, वय २३ वर्ष, रा. दावसा नरखेड, मालक नामे—२) नंदू काळे रा. महेंद्री नरखेड** हे रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून महिंद्रा अर्जुन ट्रॅक्टर विनानंबरचां ट्रॉलीसह किंमती ६,००,०००/— रु. व एक ब्रास रेती किंमती ५०००/— रू असा एकूण ६,०५,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे जलालखेडा यांचे ताब्यात देवून आरोपीं विरूद्ध कलम ३७९ भादंवी सहकलम ४८(८) महसूल अधिनियम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक आशिष ठाकूर, सहायक फौजदार चंद्रशेखर गडेकर, पोलीस हवालदार प्रमोद तभाने, चालक पोलीस अंमलदार लांजेवार स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांचे पथकाने केली.



## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. पारशिवनी :— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. ३७४/२२ कलम ३७६(ड)(ब), ३७६(२)(एन), ५०६ भादवि सहकलम ४, ६ पोक्सो. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दि. २०/११/२२ चे १३/०० ते दि. ११/१२/२२ चे १४/०० वा.यातील फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलीच्या वयाचा गैरफायदा घेवुन **आरोपी क्र. १) नामे— रोशन अशोक वाढीवे वय २२ वर्ष रा. सिंगोरी (आबादी) त. पारशिवनी व विधीसंघर्षित बालक** यांनी संगनमत करून पिडीतेशी वारंवार जबरदस्तीने शारिरीक संबंध प्रस्थपित केले.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि सीमा बेंद्रे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. ०३ राउत मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक ०७/०३/२०२४ रोजी मा. डी. जे. ०३ राउत मॅडम यांनी वरील नमुद आरोपी क्र. १) यास सदर गुन्हयात कलम ३७६(अ), (ब) मध्ये आजीवन कारावास व ५०००/—रू. दंड दंड न भरल्यास ६ महीने कारावास तसेच कलम ५०६ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू. दंड दंड न भरल्यास २ महीने कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

( टिप :—विधीसंघर्ष बालक यांचेविरूध्द बालन्यायालय नागपुर येथे केस सुरू आहे.)

सरकारचे वतीने एपीपी शेख मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन मपोहवा स्मिता मोहनकर यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर